तरुण भारत | रविवार, १५ जानेवारी २०२३

# दोडामार्गात रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रम

**दोडामार्ग :** रस्त्यावर चालताना, वाहन चालवताना सर्वांनी सर्व वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. स्वत:मुळे कोणताही अपघात होणार नाही याची दक्षता घेत वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन जबाबदारीने चालवावे, असे आवाहन मोटर वाहन निरीक्षक जितेंद्र पाटील यांनी केले. ११ ते १७ जानेवारी या कालावधीत ३३ वा रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्गमार्फत राबविला जात आहे. याअंतर्गत येथील हळबे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियानाचे मार्गदर्शन श्री. पाटील यांनी केले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सामाजिक कार्यकर्ते उदय पास्ते, प्रा. डॉ. संजय खडपकर, प्रा. प्रज्ञाकुमार गाथाडे, अनिल मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे मालक अनिल पावसकर, प्रकाश गवस आदी उपस्थित होते. श्री. पाटील पुढे म्हणाले की, बसमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे, वाहनानसोबत कोणत्या प्रकारची कागदपत्रे वापरावीत, अपघात होऊ नये यासाठी काय करावे तसेच अपघात झाल्यास काय करावे, वेगमर्यादेचे पालन का करावे, दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे, रस्त्यावर लावण्यात आलेली वेगवेगळी चिन्हे आदींबाबत सविस्तर माहिती पाटील यांनी बोलताना दिली. शिवाय सर्वांनी वाहन नियमांचे पालन करावे व सुरक्षित प्रवास करावा असेही आवाहन शेवटी पाटील केले.